अति महत्वाचे
कालमर्यादा

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वापरण्यात आलेल्या जुन्या मस्टरचा आढावा घेऊन दिनांक १.४.२०१२ रोजी ताब्यात घेणे आणि २०११-१२ मधील सर्व न वापरलेले जुने मस्टर (invalidate) अवैध करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
परिपत्रक क्रमांक : मग्रारो २०१२/प्रक्र. ४५/रोहयो-१०-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २८ मार्च, २०१२.

**शासन आदेश :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मजूरांची उपस्थिती मस्टरमध्ये नोंदविण्यात येते. या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही तहसीलदार आणि गट विकास अधिकारी यांनी लाईन डिपार्टमेंट आणि ग्रामपंचायत यांना गठ्ठा पध्दतीने मस्टर वितरित केले आहे. त्यामुळे त्यांना वितरित केलेल्या मस्टर पैकी किती मस्टर वापरण्यात आले . तसेच न वापरलेली मस्टर कोठे ठेवण्यात आली हयाची त्यांना माहिती नाही. खरे तर मस्टर शीट हे तहसील आणि पंचायत समितीमध्ये मेन स्विच सारखे नियंत्रणाचे प्रमुख साधन आहे. परंतु हा विषय वारंवार सूचना दिल्यानंतरसुध्दा अत्यंत दुर्लक्षीत आहे. या कारणांमुळेच तहसीलदार आणि गट विकास अधिकारी, एम.पी.आर ची माहिती देण्यामध्ये असमर्थ आहेत, कारण त्यांना योजने अंतर्गत किती काम झाले आणि त्यासाठी किती रक्कम अदा केली , किती मनुष्य दिवस निर्मित झाले, कुशल अर्ध कुशल बाबींवर किती खर्च झाला तसेच थकीत देयके इत्यादीबाबतची माहिती नाही. तसेच त्यांचे प्रमुख नियंत्रणाचे साधन अर्थात मस्टर शीट वितरण यावर नियंत्रण नाही.

मस्टर हे चेक किंवा बाँड पेपर सारखे अत्यंत मौल्यवान आहे. त्याचे वितरण अत्यंत काळजीपूर्वक नियोजनबध्द पध्दतीने आणि नियंत्रणाखाली होणे आवश्यक आहे. जर आपण नियंत्रणाशिवाय मस्टर वितरित केले तर आपल्याला गैरवापर किंवा यामध्ये घोटाळा (स्कॅण्डल्स) करण्यास निमंत्रण दिल्यासारखे आहे. यासंदर्भात विस्तृत सूचना अलाहिदा देण्यात येत आहेत. परंतु तुर्त मस्टर व्यवस्थापनाचे नियंत्रणासाठी खालील सूचना देण्यात येत आहेत आणि त्याचे काटेकोरपणे पालन होणे आवश्यक आहे.

१) जिल्हाधिकारी कार्यालय, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद कार्यालय, तहसिल कार्यालय आणि पंचायत समिती मध्ये वर्ष २०११-१२ साठी वापरण्यात आलेले, न वापरण्यात आलेले आणि उपलब्ध असलेली सर्व मस्टर यांचा दिनांक १ एप्रिल, २०१२ पर्यंतचा आढावा घेणे

अ) जिल्हाधिकारी कार्यालय, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद कार्यालय, तहसिल कार्यालय आणि पंचायत समिती येथे उपलब्ध असलेले व न वापरलेले (कोरे मस्टर) सर्व मस्टरचा आढावा घेण्यात यावा. यासाठी एक रजिस्टर ठेऊन अनुक्रमाने त्याच्या नोंदी घेण्यात यावी किंवा सध्या तहसिलदार किंवा पंचायत समिती मध्ये उपलब्ध असलेल्या मस्टर स्टॉक रजिस्टरमध्ये नवीन पानामध्ये मस्टरची नोंद घ्यावी. सदर काम हे दिनांक २ एप्रिल, २०१२ पूर्वी करण्यात यावे कारण दिनांक १ एप्रिल, २०१२ रोजी सुट्टी आहे. तहसीलदार आणि गट विकास अधिकारी यांनी अनुक्रमाने उपलब्ध असलेले सर्व मस्टरचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये दिनांक २.४.२०१२ पर्यंत निश्चितपणे कळवावा. जिल्हाधिकारी कार्यालयांनी गट विकास अधिकारी आणि तहसीलदार यांनी पाठविलेल्या मस्टरचे अहवालाशी ताळमेळ घ्यावा आणि खात्री करावी. म्हणजेच जिल्हाधिकारी कार्यालय यांनी त्यांच्या जिल्हयात वर्ष २०१२-१३ च्या सुरवातीस उपलब्ध असलेले सर्व मस्टर पुस्तकांची यादी, रजिस्टर हे दिनांक ३.४.२०१२ पर्यंत तयार करावे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांच्या कार्यालयातील उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत आणि जिल्हापरिषदेच्या रोजगार हमी योजना शाखा यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाला

सर्व माहिती एकत्रित करण्यामध्ये मदत करावी व पंचायत समितीकडून माहिती उपलब्ध करुन दिनांक २.४.२०१२ पर्यंत पूर्ण करावी. हया कार्यवाहीमुळे वर्ष २०१२-१३ साठी उपलब्ध मस्टरचा सुरवातीचा साठा तयार होईल आणि यापुढे सदर गठ्ठयामधूनच वर्ष २०१२-१३ करिता मस्टर देण्यात यावे.

ब) दिनांक ३१.३.२०१२ पर्यंत न वापरलेले सर्व मस्टर अवैध घोषित करावे.

क) तहसीलदार किंवा गट विकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत किंवा लाईन डिपार्टमेंट यांना दिनांक ३१.३.२०१२ पर्यंत वितरित केलेली परंतु न वापरलेले मस्टर (कोरे मस्टर) हे दिनिांक १.४.२०१२ पासून आपोआप अवैध राहतील. त्यामुळे तहसीलदार आणि गट विकास अधिकारी सदर जुने मस्टरचा वापर करण्याचा किंवा त्याच्यामार्फत पेमेंट करता येणार नाही. त्यांना खाली नमूद केलेल्या सूचनांप्रमाणे कारवाई करावी.

१) दिनांक ३१.३.२०१२ पर्यंत वितरित केलेले मस्टर (ज्याचा वापर मजूर नोंदीसाठी करण्यात आलेला आहे.) सुरु ठेवता येईल. ते कोरे मस्टर नसल्याने त्यांचा पुढील एक आठवडयापर्यंत वापरता येईल, असे मस्टर प्रामुख्याने मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवडयामध्ये सुरु झालेल्या कामांशी संबंधीत असेल.

२) ग्राम सेवक आणि लाईन डिपार्टमेंट यांना न वापरलेले जुने मस्टर एक आठवडयामध्ये समर्पीत करण्याची सूचना देण्यात यावी. असे न केल्यास ते शिस्तभंगाच्या कारवाईला पात्र राहतील.

३) न वापरलेले सर्मपित मस्टर हे अवैध ठरविण्यात यावे आणि त्यांना गट विकास अधिकारी आणि तहसीलदार यांनी प्रमाणीत करुन जिल्हाधिकारी कार्यालयाला दिनांक ७.४.२०१२ पर्यंत निश्चितपणे पाठवावे. जर काही मस्टर उपलब्ध नसेलतर त्याचा शोध घेऊन त्याचाही अहवाल द्यावा.

**न वापरलेल्या को-या मस्टरचा पुनःश्च वापर करण्याबाबत.**

४) जुने मस्टर तयार करण्यावर खर्च केला असल्याने तसेच कागदाचा अपव्यय टाळण्यासाठी समर्पित केलेले जुने मस्टर पुनःश्च वैध करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून स्पेशल रबर स्टॅम्प तयार करुन ते २०१२-१३ करिता वैध करावे आणि त्यावर उप जिल्हाधिकारी यांनी सही शिक्क्याने साक्षांकित केलेले पुनर्वैध मस्टर्स जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत योग्य त्या नोंदी रजिस्टरमध्ये घेऊन तालुका पंचायत समिती व तहसील कार्यालयांना वितरित करावे.

वर उल्लेख केलेल्या परिच्छेद १ ते ५ प्रमाणे दिनांक १५ एप्रिल, २०१२ पर्यंत पूर्ण करावे. जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वरील सर्व कार्यवाहीकडे व्यक्तिशः लक्ष द्यावे आणि रोजगार हमी योजना शाखा यांनी गट विकास अधिकारी यांच्याकडे विशेष लक्ष पुरवावे. कारण मस्टरची जास्त अडचण पंचायत समितीमध्ये आहे आणि तहसील कार्यालयामध्ये त्यापेक्षा कमी प्रमाणात आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने वरील सर्व कार्यवाही पूर्ण झाल्याचा दाखला विभागीय आयुक्त यांना दिनांक २० एप्रिल, २०१२ पर्यंत द्यावा आणि विभागीय आयुक्त आणि शासनाला दिनांक २५ एप्रिल, २०१२ पर्यंत निश्चितपणे त्याचा अहवाल द्यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

28/3/2012

( आर. विमला )
उप सचिव ( रोहयो ) नियोजन विभाग